# रविराज देशमुख यांच्याहस्ते हॉलीबॉल सामन्यांचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
कुऱ्हा, दि. ५ :

मन, मेंदू व मनगट यांचा जेव्हा मिलाप होतो, तेव्हा एक खेळाडू निर्माण होतो आणि अशा खेळाडूंना एक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या मेहनतीला चालना मिळावी, या उद्देशाने कुऱ्हा येथे राधेय क्रीडा मंडळ द्वारा हॉलीबॉल सामन्याचे उद्घाटन भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांच्याहस्ते दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी सौ. मीनाताई सुनीलबाबा नायर (सरपंच, ग्रामपंचायत कुऱ्हा), सलीम खा पठाण (उपसरपंच, ग्रामपंचायत कुऱ्हा), डॉ. अनुप वाकोडे (ठाणेदार, पोलीस स्टेशन कुऱ्हा), संजय इंगोले (अध्यक्ष,




सूर्यवंशी बारी समाज मंडळ कुऱ्हा), सौ. कन्नाके मॅडम (प्राचार्या, विद्यानिकेतन उच्च माध्यमिक शाळा, कुऱ्हा), चांबटकर (प्राचार्य, कुऱ्हा हायस्कुल), संतोष भैसे (सामाजिक कार्यकर्ते, कुऱ्हा), दीपक खंडारे (संयुक्ता, इण्डेन गॅस एजेन्सी कुऱ्हा), अश्विन जयस्वाल (सामाजिक कार्यकर्ते कुऱ्हा), यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उदघाटक रविराज देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र) यांच्याहस्ते मैदानाचे पूजन करून हॉलीबॉल चे सुद्धा पूजन करण्यात आले. तसेच उदघाटकीय सामन्यात खेळणाऱ्या खेळाडूंना सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर यावेळी आयोजकांच्या वतीने रविराज देशमुख यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

आपल्या उदघाटकीय भाषणात बोलताना रविराज देशमुख यांनी राधेय क्रीडा मंडळाच्या आयोजनाबाबत गौरवोद्गार काढत राधेय क्रीडा मंडळ दरवर्षी कुऱ्हा गावातील युवकांना अशा स्पर्धेच्या माध्यमातून एक मोठे व्यासपीठ निर्माण करून देते, आणि त्यातूनच खेळाडू निर्माण होतात. आणि आपल्या गावाचं नाव मोठमोठ्या स्पर्धेत आपल्याला ऐकायला मिळते. खेळाडू वृत्ती माणसाला कुठल्याही स्पर्धेत खेळण्याची जिद्द निर्माण करते, त्यामुळे खेळाडू हा कायम तरुण व तडफदार असतो, प्रत्येक युवकांचे आपल्या मातीशी व मैदानाशी नाते असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

कुऱ्हा या गावातील अनेक खेळाडू आजपर्यंत राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचले आहे, आणि अजूनही अनेक खेळाडू क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत आहे. अशा खेळाडूंना ग्रामपंचायत स्तरावर अनेक सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत राहणार असून ग्रामपंचायत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंच्या पाठीशी नेहमी राहणार असल्याचे प्रतिपादन, सरपंच सौ. मीनाताई सुनिलबाबा नायर यांनी केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अनुग्रह नायर, कैलास कुऱ्हेकर, राजू बिंड, राम इखार, संजू इंगोले, विजय गाढवे, संदीप पोकळे, योगेश इंगोले, योगेश दारोकार, गौरव इंगोले, शैलेश पोकळे, सुरज दारोकार, रोहन मेश्राम, आदित्य रघुते, चेतन माऊले, सोम्य डहाके, पियुष वसुले, वैभव दारोकार, प्रियांशु पोकळे, साहिल गेडाम, शंतनू दारोकार, आयुष शाहू, संकेत राऊत, आदर्श दूधे, पार्थ भुयार यांच्यासह गावातील युवकांनी अथक परिश्रम घेतले.

# राधा पांडेला मिळाली बॅटरी सायकल



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ५ :

रामटेक येथील विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरात राहणाऱ्या राधा पंडे या दिव्यांग मुलीला चालता येत नाही. परिणामी तिला घरातच राहावे लागायचे. यामुळे तिला शाळेत जाणेही कठीण होते. ही समस्या रामटेक शहरातील शिवसेना नेते तथा माजी नगरसेवक सुमित कोठारी, शिवसेना शहर प्रमुख राजेश किंमतकर यांना कळली. त्यांनी तातडीने पुढाकार घेत दिव्यांग मुला-मुलींना नेमकी सायकल कुठून मिळते याचा शोध घेतला आणि बॅटरीयुक्त तीन चाकी सायकल राधा पंडे हिला मिळवून दिली.

मागील १ वषार्पासून राधा पंडे आणि तिचे कुटुंबीय तीन चाकी सायकल मिळावी म्हणून सरकारी कार्यालयात चकरा मारून थकून गेले होते. त्यांनी आता तर सायकल मिळायची आशाही सोडून दिली होती.

मात्र शिवसेना नेते तथा रामटेक नगर परिषदेतील माजी नगरसेवक सुमित कोठारी आणि राजेश किंमतकर यांच्या पुढाकाराने राधा पंडे हिला न्याय मिळाला. याकरिता त्यांनी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांचीही मदत घेतली. सायकल हाती येताच समाजभान जपणाऱ्यांनी तातडीने ती राधा पंडे हिला सुपूर्द केली.

यावेळी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, सुमित कोठारी, राजेश किंमतकर, राजेश नानोटे, गज्जु बिसन, राधेश्याम साखरे, हत्तीठेले, प्रणय सोमनाथे, कैलास नागपूरे, सह आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# वाडी जि.प. शाळा विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेत प्रथम



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळामधील विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेत पंचायत समिती नागपूर ग्रामीण अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वाडीने प्रथम क्रमांक पटकाविला.

विजयी विद्यार्थ्यांना सभापती सुषमा कावळे, जि.प. सदस्य आतिश उमरे, पं.स. सदस्य राजेंद्र उईके, गटविकास अधिकारी संदीप गोडसेलवार, गटशिक्षणाधिकारी आरती साळुंखे, ज्योत्स्ना हरडे, शिक्षण विस्तार अधिकारी, रेश्मा शेख चंद्रभान शोभने, नारायण चापले, पौर्णिमा येरपुलवार, निता वलके, साक्षी गायकवाड, अनुसया सोनवाणे, राजकुमार पचारे यांच्या उपस्थितीत बक्षिस देण्यात आले.

या सर्व विजयी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका तथा मार्गदर्शिका प्रतीक्षा फाटे, शिक्षिका ललिता गोंडचर, योगिता गुप्ता, क्रीडा शिक्षक मोहारे, शिक्षक रुपेश भोयर पुरुषोत्तम चिमोटे, रवी टेकाम, दिपचंद पेंडकांडे आदींनी कौतुक केले.

# सावित्री बाई फुले गौरव ग्रंथाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ : -

सावित्रीबाई फुले यांच्या १ ९४ व्यां जयंती निमित्त त्यांचे कार्य,साहित्य व विचारांचा गौरव करणारा ग्रंथ, सावित्री बाई फुले गौरव ग्रंथाचे प्रकाशन महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह, रेशिमबाग येथे राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर,मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, कुलगुरु, प्रा.डॉ.अविनाश आवलगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी माजी आमदार,अशोक मानकर विराजमान होते. प्रमुख अतिथी डॉ.वेदप्रकाश मिश्रा मुख्य सल्लागार, दत्ता मेघे इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सावंगीचे (मेघे), डॉ.श्रीनिवास खांदेवाले ज्येष्ठ अर्थतज्ञ, डॉ. विनायक देशपांडे, कुलगुरु जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम करण्यात आला.

# शिक्षण हेच यशस्वी जीवनाचे माध्यम : शैल जैमिनी




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांचे कार्य असामान्य आहे. पहिल्या मुस्लिम शिक्षीका फातिमा शेख यांनीही त्यांना साथ दिली.

मुलींना शिकवणे त्यांची तयारी या व्यतिरिक्त मतीबंदी केशवपन या दुष्ट प्रथा सावित्रीबाईनी बंद केल्या. शिक्षण हेच यशस्वी जीवनाचे माध्यम आहे.असे प्रतिपादन समाज सेविका शैल जैमिनी यांनी केले.

द्रुगधामना येथील उदय फिजोथेरेपी मेडिकल कॉलेज, पार्श्वनाथ पब्लिक स्कूल, श्री साई ताज पॉलीटेक्नीक यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक उदय टेकाडे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून शैल जैमिनी उपस्थित होत्या.

सर्वप्रथम दीप प्रज्वलीत करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पुजन केले. संचालन मुख्याध्यापिका अन्नू पाल यांनी तर आभार प्राचार्य शिबा अहमद यांनी मानले. आयोजनासाठी प्राचार्य सुप्रिया तांबे, प्रा. डेनिस मायकल, प्रा. श्रेयश गायकवाड, प्रा. सुजाता गुरवे, प्रणय खैरे, ओंकार मडावी, आचल गुरनुले, अनुश्री राठोड, आयुषी कापगते, ध्रुव छांगाणी, गरिश्मा लोणारे, हिमांशू डोले आलिशा शेख, रिया कोहळे, माक्षी मदनकर, सलोनी खोब्रागडे, यांनी सहकार्य केले.

# वानाडोंगरी शहर अध्यक्षपदावर सिताबाई खंडागळे यांची नियुक्ती



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ५ :

आदर्श ज्येष्ठ नागरिक महिला मंडळ, वानाडोंगरीच्या शहर अध्यक्षपदावर एकमताने नियुक्ती करण्यात आली. आदर्श ज्येष्ठ नागरिक मंडळाची मासिक सभा मंडळाचे अध्यक्ष अण्णाजी वियनवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्याच निवासस्थानी संपन्न झाली.

याप्रसंगी उपाध्यक्ष वामन डवरे,कोषाध्यक्ष राजु सपाटे,ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकर कापसे ,रमाबाई कापसे व विनायक इंगळे गुरुजी उपस्थित होते. या सभेत महिला मंडळाची रीतसर स्थापना करण्यात आली.यामध्ये आदर्श ज्येष्ठ नागरिक महिला मंडळाच्या शहर अध्यक्षपदी सीताबाई खंडागळे यांची निवड करण्यात आली.

तर उपाध्यक्ष पदावर मीनाबाई निमजे, चित्राबाई सायने यांची सचिव व माजी नगरसेविका सौ. चंदाबाई अजमिरे यांची कोषाध्यक्ष पदावर सवार्नुमते नियुक्ती करण्यात आली. तसेच आदर्श ज्येष्ठ नागरिक मंडळ हिंगणा शहराची शाखा स्थापन करण्यात आली असून अध्यक्षपदावर वामनराव डवरे यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष पदावर श्रीमती रमाबाई कापसे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी लिला शेंडे, सिंधु नरवड, कलावती वानखेडे, संगिता देशमुख, यशोदा सोमनकर, नंदा क्षिरसागर, रेखा ठाकरे, इंदु गिरी, वंदना तट्टे, बेबी झाडे, तारा अड्याळकर, गोविंदराव घाटोळे, वामन शेंडे, मधुकर सेलुकर, अशोक सायने व इतर उपस्थित होते.

# एमसीव्हीसी खैरगावचे प्रा. किशोर येवले यांचा सेवानिवृत्त सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ५ :

स्थानिक खैरगाव येथील जनता हायस्कूल व कनिष्ठ एमसीव्हीसी महाविद्यालय खैरगावंचे प्राध्यापक किशोर निळकंठ येवले हे दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने दि. १ जानेवारी २०२५ रोजी त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अनिल साठोणे, पर्यवेक्षिका सुषमा साठोणे याच्या प्रमुख उपस्थितीत शाल, नारळ, व गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आला. येवले हे २९ वर्ष सेवाकरत कार्यरत राहिले. स्वभावाने प्रेमळ आणि मनमिळाऊ, काम करण्याची जिद्द, मित्रत्वाचे संबंध, कायम ठेवत २९ वर्ष सेवा करत कसे दिवस निघाले हे अजूनही लक्षात आले नाही असे भावनिक उद्गार सेवानिवृत्ती निरोप समारंभ कार्यक्रमात संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अनिल साठोणे यांनी यावेळी अवगत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आकोटकर, संचालन प्रा. माहुरे आणि आभार प्रा. घारपुरे यांनी मानले. यावेळी जनता हायस्कूल व कनिष्ठ एमसीव्हीसी महाविद्यालयाचे प्राध्यापक तिजारे, नेवले, दातिर, हायस्कूलचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोंढाळी संघाची शालेय राज्य स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. ५ :

लाखोटीया भूतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी मुलींचे संघाने अंतिम चूरसपूर्ण सामन्यात अप्रतिम कामगिरी बजाबीत राज्याचे उपविजेता पद पटकाविले.

क्रीडा व युवक संचनालय पुणे द्वारा आयोजित शालेय राज्यस्तरीय डॉजबॉल 19 वर्ष वयोगटातील स्पर्धाचे आयोजन नेहरू स्टेडियम यवतमाळ येथे दि 2 ते 3 जानेवारी 2025 दरम्यान करण्यात आले होते. सदर स्पर्धेत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणारा कनिष्ठ महाविद्यालयाचा मुलींचे संघाने



राज्यात उपविजेता पद पटकावून आपला डॉजबॉल स्पर्धेतील प्रभाव कायम ठेवला. स्पर्धेत राज्यातील आठ विभागीय मुलामुलींचे एकूण 16 संघ सहभागी झाले होते.

सलामीचे मुलींचे सामन्यात अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणारा बुलढाणा संघाला 11-1 अशी 10 गुणांनी एकतर्फी मात करून कोंढाळी संघाने उपांत्य फेरीत सामन्यात 16-2 फरकाने 14 गुणाने विजय मिळवीत अंतिम फेरी प्रवेश मिळविला.अंतिम फेरीतील चूरसीचे सामन्यात पहिल्यांफेरीत 4 गुणाने आघाडी असलेल्या कोंढाळी संघाला दुसऱ्या फेरीत उपविजेता पदावर समाधान मानावे लागले. विद्यालयाचे 19 वर्ष वयोगटातील मुलांचे संघाने नागपूर विभागाचे प्रतिनिधीत्व केले होते. दोन्ही मुला-मुलींचे संघातुन विद्यालयाचे 24 खेळाडू शालेय राज्य स्पर्धेत सहभागी झाले होते. डॉजबॉल खेळात विद्यालयाचा संघ दरवर्षी अंतिम फेरीत सहभागी होत असून विजेता उपविजेता पदाची दावेदारी मिळण्यात सुयश मिळत आहे. स्पर्धेत राष्ट्रीय खेळाडू व संघाचे कर्णधार प्रणाली चव्हाण, डिम्पल घाटोडे सह संघाने उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन केले.संघाला प्रशिक्षक तथा मार्गदर्शक सुधीर बुटे, भूषण राचलवार, हरीश राठी, उज्वल मोटघरे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष राजेशजी राठी, सचिव डॉ श्यामसंदरजी लद्धड, उपाध्यक्ष रेखाताई राठी, कोषाध्यक्ष मधुसूदनजी राठी, प्राचार्य सुधीर बुटे, उपप्राचार्य कैलास थुल, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रीडाप्रेमी यांनी विजेता संघाला शुभेच्छा दिल्या.

# जिजाऊ ब्रिगेड तर्फे सावित्रीमाई यांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ५ :

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या,ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती स्थानिक घोडे प्लॉट येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा मोहिनी कडू होत्या.

यावेळी शारदा आलोडे, डॉ.रंजना कडू, रेखा मोहोड, मंजूषा ठाकरे, साधना पोतदार,वैशाली बोरकर, रश्मी बोदड,प्रमीला गांजरे, पदमा नासरे, वैशाली राऊत, रूपाली डंबाळे, कवीता कळसाईत, कल्पना लोहे,वनीता गोरे, घोरमाडे,बन्सोड यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन रेखा मोहोड तर आभार प्रदर्शन वैशाली बोरकर यांनी केले.

# मासेमार बांधवांसाठी विशेष शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ५ :

महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडून मच्छीमाराचे जीवनमान उंचविण्याकरीता मत्स्य व्यवसायासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

शासनाच्या सर्व योजना मासेमारापर्यंत पोहचविण्याकरिता तसेच मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन, मासेमारांना अर्थसहाय्य प्राप्त करण्याच्या उद्देशाने नेशनल फिशरीज डिजीटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. मच्छीमार, मत्स्यव्यावसायिक, मत्स्यसंवर्धक, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचे लाभार्थी तसेच मच्छीमार सहकारी संस्था, तसेच ज्यांचा मासेमारीशी प्रत्यक्षात संपर्क येतो अशी व्यक्ती आणि मत्स्यउत्पादक संस्थांनी या नोंदणी प्रक्रियेत सहभागी होऊन आपले NFDP नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करावे असे आवाहन शुभम कोमरेवार, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी केले आहे, नोंदणी प्रक्रियेसाठी इच्छुक व्यक्तीनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी करावी.

यासाठी आधार कार्ड, आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक, आणि बँक पासबुक यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे अनिवार्य आहेत. नोंदणी प्रक्रियेची अधिक माहिती घेण्यासाठी आणि मार्गदर्शनासाठी नजीकच्या महा ई-सेवा केंद्राशी/आपले सरकार केंद्राशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

रामटेक तालुक्यातील सर्व मच्छीमार आणि मत्स्यव्यावसायिक यांच्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता रामटेक येथील फिशरमॅन मल्टी परपज को-ऑपरेटिव्ह सोसायटी (मच्छी सोसायटी, रामटेक) च्या कार्यालयात विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या कंम्पमध्ये नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल व नोंदणी करून देण्यात येईल. नोंदणीमुळे संबंधित व्यक्तींना मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ थेट मासेमारांच्या खात्यामध्ये मिळण्यास मदत होईल. यामध्ये मासेमारांना सर्व योजने अंतर्गत अर्थसहाय्य, प्रशिक्षण, आणि विविध प्रोत्साहनपर सुविधा यांचा समावेश आहे.

डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या योजनांची माहिती जलद आणि सोप्या पद्धतीने मिळू शकेल. सदरची माहिती ही केंद्र शासनाच्या यंत्रणेकडे जतन केली जाईल व त्याचा उपयोग भविष्यात नवीन योजना तयार करण्यासाठी केला जाणार आहे.


## जाहिरानामा

महसुल विभाग
तहसिलदार कामठी यांचे कार्यालय
दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९- २९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com

प्रस्तु-४ना.तह.कामठी/कावि-३७१-२०२४ दिनांक :-२६/१२/२०२४
वाचा -१. जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९
२. जन्म मृत्यू नोंदणी (सुधारक) कायदा २०२३
३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/जन्म मृत्यू आदेश/कावी १५८/२०२३, दि. ११/०५/२०२४
५. अर्जदार **श्रीमती शबाना अंजम अब्दुल नईक रा.न्यु येरखेडा, कामठी,** ता. कामठी जि. नागपूर यांचा अर्ज दिनांक ०२/१२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार **श्रीमती शबाना अंजुम अब्दुल नईक रा. न्यु येरखेडा, ता. कामठी** जि. नागपूर यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःच्या जन्माच्या नोंदणीसाठी **महाराष्ट्र जन्म/मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३)** अन्वये जन्माची नोंद नगर परिषद, कामठी यांचे दप्तरी घेण्याकरिता आदेशीत करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे. **अर्जदार श्रीमती शबाना अंजुम अब्दुल नईक** यांचा **दिनांक ०१/०७/१९६९ रोजी** जन्म, **नया बाजार, कामठी** या निवासस्थानी झालेला असल्याचे त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, कामठी उपरोक्त वाचा क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणत्याही हितसंबंधाचे काही आक्षेप/उजर/हरकती असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह या कार्यालयात जातीने किंवा त्यांचे मान्यता प्राप्त विधी अधिकारी मार्फत अथवा अन्य मार्गाने लेखी आक्षेप अर्ज **२५/०१/२०२५** दिनांक चे आत या कार्यालयात सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

| अनु क्र. | जन्म व्यक्तीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १ | श्रीमती शबाना अंजुम अब्दुल नईक | स्वतः |

(उमेश शं. अंबादे)
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी

## जाहिरानामा

महसुल विभाग
तहसिलदार कामठी यांचे कार्यालय
दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९- २९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com

प्रस्तु-४ना.तह.कामठी/कावि-१८-२०२४ दिनांक :-२६/१२/२०२४
वाचा -१. जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९
२. जन्म मृत्यू नोंदणी (सुधारक) कायदा २०२३
३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/जन्म मृत्यू आदेश/कावी १५८/२०२३, दि. ११/०५/२०२४
५. अर्जदार **श्री. रेयाज अहमद मोहम्मद जहीर रा. लाल मदरसा जवळ वारीसपूरा कामठी,** ता. कामठी जि. नागपूर यांचा अर्ज दिनांक ०२/१२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार **श्री. रेयाज अहमद मोहम्मद जहीर रा. लाल मदरसा जवळ, वारीसपुरा ता. कामठी** जि. नागपूर यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःच्या जन्माच्या नोंदणीसाठी **महाराष्ट्र जन्म/मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३)** अन्वये जन्माची नोंद नगर परिषद, कामठी यांचे दप्तरी घेण्याकरिता आदेशीत करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे. **अर्जदार श्री. रेयाज अहमद मोहम्मद जहीर** यांचा **दिनांक ०२/०२/१९६६ रोजी** जन्म, **वारीसपुरा, कामठी** या निवासस्थानी झालेला असल्याचे त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, कामठी उपरोक्त वाचा क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणत्याही हितसंबंधाचे काही आक्षेप/उजर/हरकती असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह या कार्यालयात जातीने किंवा त्यांचे मान्यता प्राप्त विधी अधिकारी मार्फत अथवा अन्य मार्गाने लेखी आक्षेप अर्ज **२५/०१/२०२५** दिनांक चे आत या कार्यालयात सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

| अनु क्र. | जन्म व्यक्तीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १ | श्री.रेयाज अहमद मोहम्मद जहीर | स्वतः |

(उमेश शं. अंबादे)
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

